Guru Gobind Singh Foundation's

Guru Gobind Singh College of Engineering and Research Centre, Nashik.

# Activity reports of various day celebrations by library (A.Y. 2023-24)

# Guru Gobind Singh College of Engineering & Reserch Centre Nashik

## Event Report

Department: Central Library

| Title of Program | मराठी भाषा गौरवदिना निमित्त काव्य वाचन व गझल गायन कार्यक्रम |
|---|---|
| Objective of Program | मराठी भाषा संवर्धन आणि विद्यार्थांच्या मनात मायबोली बद्दल आदर निर्माण करून उपजत काव्य साहित्याला बळ मिळावे या करिता केलेला हा उपक्रम |
| Date of Program | 4/03/2024 |
| Venue | GCOERC LCH Seminar Hall |
| Organised By | Library Department |
| Program In-Charge | Ms. Nishigandha Khaire, Librarian, GCOERC |
| Supporting Staff Member | Mr. Yogesh Chumbhale, Asst. Librarian, GCOERC |
| Program Approved by Principal/HOD | Principal (GCOERC) |
| Programme document | Photo Graph ,PPT, Attendance |
| Students present at the program | 15 Participant and above 90 Present |
| Nature of Report Submission | Principal |
| Brief about the Program (Activity/Event) | . ग्रंथालय विभागातर्फे मराठी भाषा गौरवदिना निमित्त आयोजित काव्य वाचन व गझल गायन कार्यक्रमाचे. चे आयोजन दि ४ मार्च २०२४ रोजी दुपारी २ वाजता करण्यात आले या मध्ये कवी, गझलकार, समाजसेवक कु.वैजयंती सिन्नरकर, श्री. संजय आहेरव श्री. बाळासाहेब गिरी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, शिक्षक वृंद व विदयार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.<br><br>कवी आणि गझलकार प्रमुख अतिथींनी विविध विषयांवर कविता गझल सादर केल्या तसेच मराठी भाषा आपली बोली संवर्धन करावे असे अव्हान देखील विद्यार्थांना केले. कवितां मधून सामाजिक समस्या तरुण वर्ग आणि सद्यस्थितीचे दर्शन विद्यार्थांना घडविली. तसेच विद्यार्थांनी शेतकऱ्याच्या व्यथा आणि विवंचना या विषयी पथनाट्य सादर केले.त्या सादरीकरणा करिता प्रमुख पाहुण्यानं कडून ३०० रुपये आणि प्राचार्यांकडून ५०० रुपये प्रोत्साहन पर बक्षीस देण्यात आले.प्राचार्यांनी मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल निशिगंधा खैरे यांनी केले.महाविद्यालयाचे विद्यार्थी आशुतोष भगत, जानवी डांगे, मंजिरी म्हसके, ऋषिकेश साहणे, दर्शन शिंगाणे, जान्हवी म्हसके याच्या स्वरचित कविता सादरीकरणाने कार्यक्रमाची रंगत वाढली व कार्यक्रम्स विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.संकेत जाधव आणि प्राची गायकवाड ह्या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन केले . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल निशिगंधा खैरे यांसह योगेश चुंभळे व विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली. |
| Name and Sign of Program In charge | Mrs. N. R. Khaire [signature] 06.03.2024 |
| Sign of Principal | [signature] |




vivo T1

## साहित्याचा वारसा चालवूया गडे, मराठी पाऊल पडते पुढे...
## दिनांक : ०४.०३.२०२४

प्रत्येक मराठी माणसाने आपल्या मायबोलीचा स्वाभिमान बाळगणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन करत मराठीचा गौरव हा तिच्या घरातच झाला पाहिजे, रोजचे दैनंदिन संभाषण करताना मराठीच व्यक्त व्हावे तरच मराठी अजून समृद्ध होईल, असा आशावाद आपल्या मनोगतामध्ये डॉ. नीलकंठ निकम यांनी व्यक्त केला. निमित्त होते गुरू गोबिंद सिंग अभियांत्रिकी महाविद्यालयात ग्रंथालय विभागातर्फे मराठी भाषा गौरवदिना निमित्त आयोजित काव्य वाचन व गझल गायन कार्यक्रमाचे. कार्यक्रमासाठी प्रसिद्ध कवी, गझलकार, समाजसेवक कु.वैजयंती सिन्नरकर, श्री. संजय आहेरव श्री. बाळासाहेब गिरी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, शिक्षक वृंद व विदयार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वैजयंती सिन्नरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची जीवनमूल्ये प्रत्येकाने आपल्या आयुष्यात आत्मसात करण्याची गरज असल्याचे दर्शवत "पण राजे पुन्हा जन्माला या" ही कविता सादर केली. कॉलेज युवकांना भुरळ पडणारी कॉलेज जीवनावरील "कॉलेज कट्टा", "पुढे काय" अशा युवतींना आवडणाऱ्या कविता सादर केल्या.

संजय आहेर यांनी वडिल काय आहेत हे समजण्यासाठी त्यांना वडाची उपमा देत त्यांचे कष्ट, त्यांची सहनशक्ति त्यांचा आधार आणि वडिलांवरील प्रेम दर्शवणारी "अनमोल उपकार आहेत वडाचे" हे काव्य सादर केले. "मित्र वनव्या मध्ये गारव्या सारखा" हे विडंबनगीत सादर केले.

तसेच बाळासाहेब गिरी यांनी " बाप यावा जगण्यात, तोच घ्यावा विचारात,बाप आचार विचार, तोच गारवा उन्हात" ही अन्नदाता शीर्षकाची कविता सादर केली.

प्रमुख अतिथिनी आपल्या मनोगतामध्ये त्यांच्या मराठीतील विविध स्वरचित कविता तसेच गझल सादर करून त्यांचा उलगडा केला आणि उपस्थितांची मने जिंकली. आपल्या वक्तव्यामध्ये मराठी भाषेच्या भवितव्याची उगीचच धास्ती करू नये असे मत प्रतिपादन करत उपस्थित विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. चित्रपट, संगीत, साहित्य, शैक्षणिक आदी क्षेत्रांमध्ये मराठी सारस्वत अग्रेसर आहेत आणि राहतील, यावर आपले मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी साहित्यकृती लेखनाच्या सूचना केल्या. आपली मायबोली रुजवण्या साठी बोलीभाषेतच काव्य रचना कराव्यात तरच त्या वाचकांच्या हृदयाचा ठाव घेतात असे मार्गदर्शन केले.

ग्रंथपाल निशिगंधा खैरे यांनी प्रास्ताविकपर सत्रात मराठी भाषा गौरव दिनाचे महत्त्व विशद करत कुसुमाग्रजांचे मराठी साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रातील स्थान हे ध्रुवताऱ्य प्रमाणे आहे असे म्हटले. कलाकारांसाठी अभिनयाचा कस लागावा असे श्रेष्ठ व सर्वोत्तम साहित्य कलाकृती कुसुमाग्रजांनी आपल्याला दिलेली आहे त्याबद्दल त्यांनी थोडक्यात माहिती दिली. महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या अंतर्गत परीक्षांमुळे सदर कार्यक्रम घेण्यास विलंब झाला याबद्दल खंत ही व्यक्त केली.

महाविद्यालयाचे प्रथम वर्षाचे विद्यार्थी वैभवी थेटे , नंदिनी पाटील, इराम मानियर, श्रावणी शिंपी, सुफीयन सय्यद, अर्पित काणोजिया, प्रथमेश नागरे ह्या विद्यार्थ्यांनी शेतकरी राजा च्या जीवनावर नाटिका सादर केली. निसर्गाचा कहर शेतकर्याचे जीवन कसे उध्वस्त करून टाकतो याचे वास्तववादी चित्रण ह्या नटिकेत दाखवण्यात आले.

उत्कृष्ट कथानक व अभिनयामुळे ह्या सादरीकरनाणे प्रेक्षकांचे डोळे पाणावले. मान्यवरांच्या हस्ते ह्या विद्यार्थी चमुला रोख परितोषिक देत गौरवण्यात आले.

महाविद्यालयाचे विद्यार्थी आशुतोष भगत, जानवी डांगे, मंजिरी म्हसके, ऋषिकेश साहणे, दर्शन शिंगाणे, जान्हवी म्हसके याच्या स्वरचित कविता सादरीकरणाने कार्यक्रमाची रंगत वाढली व कार्यक्रम्स विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.संकेत जाधव आणि प्राची गायकवाड ह्या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल निशिगंधा खैरे यांसह योगेश चुंभळे व विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.

GURU GOBIND SINGH FOUNDATION'S
# GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH CENTRE
APPROVED BY AICTE, GOVT OF MAHARASHTRA & DTE MUMBAI, AFFILIATED TO SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
ESTD : 2013
NAAC ACCREDITATION FIRST CYCLE 'B+' WITH CGPA 2.72 IN APRIL 2019, DNV- GL CERTIFIED FOR ISO 9001 2015 STANDARDS

GCOERC/LAB/ Event/2023-24/ 5106

दिनांक: ०३/०३/२०२४

## आभार पत्र

प्रति,

मा.श्री संजय आहेर
कवि/गीतकार/विडंबनकार
नाशिक

**विषय: कविता वाचन आणि गझल गायन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती बद्दल ..**

मा. महोदय,
सस्नेह नमस्कार,

आपण आमच्या निमंत्रणास मान देऊन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिलात त्याबद्दल खूप खूप धन्यवाद. आपण आपल्या सहज शैलीत कविता आणि गझल सादर करून सर्वांना मराठी भाषेचे दर्जेदार साहित्य संपदेची जाणीव करून दिलीत त्या बद्दल धन्यवाद.. तसेच आपल्या मार्गदर्शनाचा देखील आमचे नवकवी विद्यार्थ्यांना निश्चित लाभ होईलआपले मनःपूर्वक धन्यवाद...

डॉ. नीलकंठ निकम
प्राचार्य

PRINCIPAL
U GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING
& RESEARCH CENTRE, NASHIK

GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING AND RESEARCH CENTRE
AICTE-F.NO. WESTERN/2013/ 1-1404766831 Dt. 22.04.2013
NASHIK-9

GURU GOBIND SINGH FOUNDATION'S
GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH CENTRE
APPROVED BY AICTE, GOVT OF MAHARASHTRA & DTE MUMBAI, AFFILIATED TO SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
ESTD : 2013
NAAC ACCREDITATION FIRST CYCLE 'B+' WITH CGPA 2.72 IN APRIL 2019. DNV- GL CERTIFIED FOR ISO 9001 2015 STANDARDS

GGCERC/LIB/Event/ 2023-24/ 5105

दिनांक: ०२/०३/२०२४

# निमंत्रण पत्र

प्रति,

मा.श्री संजय आहेर
कवि/गीतकार/विडंबनकार
नाशिक

**विषय: कविता वाचन आणि गझल गायन कार्यक्रमास प्रमुख अतिथि म्हणून उपस्थित राहणे बद्दल...**

मा. महोदय,

आपणास सस्नेह नमस्कार,

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी तिचे संवर्धन व सार्वत्रिक वापर होण्यासाठी प्रतिवर्षी २७ फेब्रुवारी हा दिवस "मराठी भाषा गौरवदिन" म्हणून साजरा केला जातो.या वर्षीही आमच्या महाविद्यालयात याचे औचित्य साधून ग्रंथालय विभागाकडून काव्य वाचन व गझल गायनचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमास आपण प्रमुख अतिथि महणून उपस्थित राहवे अशी मी आपणास विनंती करते. तसेच आपले सुमधुर काव्य व गझल एकण्याची संधी आम्हास लाभेल व आमच्या नवकवी विद्यार्थ्यांना आपले मार्गदर्शनाचाहि लाभ मिळेल.

तरी आमच्या विनंतीस मान देऊन आपण आमचे आमंत्रण स्वीकारावे हि नम्र विनंती.

डॉ. नीलकंठ निकम
प्राचार्य

PRINCIPAL
GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING
& RESEARCH CENTRE, NASHIK

GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING AND RESEARCH CENTRE
AICTE-F.NO. WESTERN/2013/ 1-1404766831 Dt. 22.04.2013
NASHIK-9

GURU GOBIND SINGH FOUNDATION'S

# GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH CENTRE

APPROVED BY AICTE, GOVT OF MAHARASHTRA & DTE MUMBAI, AFFILIATED TO SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

NAAC ACCREDITATION FIRST CYCLE 'B+' WITH CGPA 2.72 IN APRIL 2019, DNV- GL CERTIFIED FOR ISO 9001 2015 STANDARDS

ESTD 2013

GCOERC / LIB / Event / 2023-24 / 506

दिनांक: ०४/०३/२०२४

## आभार पत्र

प्रति,

मा.श्री. बाळा साहेब गिरी
कवि/गझलकार
नाशिक

**विषय: कविता वाचन आणि गझल गायन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती बद्दल ..**

मा. महोदय,
सस्नेह नमस्कार,

आपण आमच्या निमंत्रणास मान देऊन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिलात त्याबद्दल खूप खूप धन्यवाद. आपण आपल्या सहज शैलीत कविता आणि गझल सादर करून सर्वांना मराठी भाषेचे दर्जेदार साहित्य संपदेची जाणीव करून दिलीत त्या बद्दल धन्यवाद.. तसेच आपल्या मार्गदर्शनाचा देखील आमचे नवकवी विद्यार्थ्यांना निश्चित लाभ होईलआपले मनःपूर्वक धन्यवाद...

डॉ. नीलकंठ निकम
प्राचार्य

PRINCIPAL
GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING
& RESEARCH CENTRE, NASHIK

GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING AND RESEARCH CENTRE
AICTE-F.NO. WESTERN/2013/ 1-1404766831 Dt. 22.04.2013
NASHIK-9

GURU GOBIND SINGH FOUNDATION'S

# GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH CENTRE

APPROVED BY AICTE, GOVT OF MAHARASHTRA & DTE MUMBAI, AFFILIATED TO SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

NAAC ACCREDITATION FIRST CYCLE 'B+' WITH CGPA 2.72 IN APRIL 2019. DNV- GL CERTIFIED FOR ISO 9001 2015 STANDARDS

GGSCOERC/LIB/Event/2023-24/5103

दिनांक: ०२/०३/२०२४

## निमंत्रण पत्र

प्रति,

मा.श्री. बाळासाहेब गिरी
कवि/गझलकार/ समाजसेवक
नाशिक

**विषय: कविता वाचन आणि गझल गायन कार्यक्रमास प्रमुख अतिथि म्हणून उपस्थित राहणे बद्दल...**

मा. महोदय,

आपणास सस्नेह नमस्कार,

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी तिचे संवर्धन व सार्वत्रिक वापर होण्यासाठी प्रतिवर्षी २७ फेब्रुवारी हा दिवस "मराठी भाषा गौरवदिन" म्हणून साजरा केला जातो.या वर्षीही आमच्या महाविद्यालयात याचे औचित्य साधून ग्रंथालय विभागाकडून काव्य वाचन व गझल गायनचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमास आपण प्रमुख अतिथि महणून उपस्थित राहवे अशी मी आपणास विनंती करते. तसेच आपले सुमधुर काव्य व गझल एकण्याची संधी आम्हास लाभेल व आमच्या नवकवी विद्यार्थ्यांना आपले मार्गदर्शनाचाहि लाभ मिळेल.
तरी आमच्या विनंतीस मान देऊन आपण आमचे आमंत्रण स्वीकारावे हि नम्र विनंती.

डॉ. नीलकंठ निकम
प्राचार्य
PRINCIPAL
GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING
& RESEARCH CENTRE, NASHIK

GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING AND RESEARCH CENTRE
AICTE-F.NO.
WESTERN/2013/
1-1404766831
Dt. 22.04.2013
★ NASHIK-9 ★

GURU GOBIND SINGH FOUNDATION'S

# GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH CENTRE

APPROVED BY AICTE, GOVT OF MAHARASHTRA & DTE MUMBAI, AFFILIATED TO SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

NAAC ACCREDITATION FIRST CYCLE 'B+' WITH CGPA 2.72 IN APRIL 2019, DNV- GL CERTIFIED FOR ISO 9001 2015 STANDARDS

ESTD : 2013

GCOERC/L213/Event/2023-24/5104

दिनांक: ०२/०३/२०२४

## निमंत्रण पत्र

प्रति,

कु.. ह.भ.प.. कीर्तन चंद्रिका वैजयंती सिन्नरकर
कवियित्री/किर्तनकार/व्याख्याते
नाशिक

**विषय: कविता वाचन आणि गझल गायन कार्यक्रमास प्रमुख अतिथि म्हणून उपस्थित राहणे बद्दल...**

मा. महोदय,

आपणास सस्नेह नमस्कार,

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी तिचे संवर्धन व सार्वत्रिक वापर होण्यासाठी प्रतिवर्षी २७ फेब्रुवारी हा दिवस "मराठी भाषा गौरवदिन" म्हणून साजरा केला जातो.या वर्षीही आमच्या महाविद्यालयात याचे औचित्य साधून ग्रंथालय विभागाकडून काव्य वाचन व गझल गायनचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमास आपण प्रमुख अतिथि महणून उपस्थित राहवे अशी मी आपणास विनंती करते. तसेच आपले सुमधुर काव्य व गझल एकण्याची संधी आम्हास लाभेल व आमच्या नवकवी विद्यार्थ्यांना आपले मार्गदर्शनाचाहि लाभ मिळेल.
तरी आमच्या विनंतीस मान देऊन आपण आमचे आमंत्रण स्वीकारावे हि नम्र विनंती.

डॉ. नीलकंठ निकम
प्राचार्य

PRINCIPAL
GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING
& RESEARCH CENTRE, NASHIK

GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING AND RESEARCH CENTRE
AICTE-F.NO. WESTERN/2013/ 1-1404766831 Dt. 22.04.2013
★ NASHIK-9 ★

GURU GOBIND SINGH FOUNDATION'S
**GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH CENTRE**
APPROVED BY AICTE, GOVT OF MAHARASHTRA & DTE MUMBAI, AFFILIATED TO SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
NAAC ACCREDITATION FIRST CYCLE 'B+' WITH CGPA 2.72 IN APRIL 2018, DNV- GL CERTIFIED FOR ISO 9001 2015 STANDARDS
ESTD : 2013

GCOERC/LAB/Event/2023-24/5107

दिनांक: ०१/०३/२०२४

## आभार पत्र

प्रति,

कु.. ह.भ.प.. कीर्तन चंद्रिका वैजयंती सिन्नरकर
कवियित्री/किर्तनकार/व्याख्याते
नाशिक

**विषय: कविता वाचन आणि गझल गायन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती बद्दल ..**

मा. महोदय,
सस्नेह नमस्कार,

आपण आमच्या निमंत्रणास मान देऊन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिलात त्याबद्दल खूप खूप धन्यवाद. आपण आपल्या सहज शैलीत कविता आणि गझल सादर करून सर्वांना मराठी भाषेचे दर्जेदार साहित्य संपदेची जाणीव करून दिलीत त्या बद्दल धन्यवाद.. तसेच आपल्या मार्गदर्शनाचा देखील आमचे नवकवी विद्यार्थ्यांना निश्चित लाभ होईलआपले मनःपूर्वक धन्यवाद...

डॉ. नीलकंठ निकम
प्राचार्य

PRINCIPAL
GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING
& RESEARCH CENTRE, NASHIK

GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING AND RESEARCH CENTRE
AICTE-F.NO. WESTERN/2013/1-1404766831 Dt. 22.04.2013
★ NASHIK-9 ★

# परिपत्रक क्र. ०९/२०२४

राज्यातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/महामंडळे, केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये, मंडळे/महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, सर्व खाजगी व व्यापारी बँका, सर्व शैक्षणिक संस्था/विद्यापीठे/महाविद्यालये इत्यादी संस्थांमधून राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने दरवर्षी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" दिनांक १४ जानेवारी ते दिनांक २८ जानेवारी या कालावधीमध्ये साजरा करण्यात येतो. त्यानुसार यावर्षी देखील मराठी भाषेसंदर्भातील विविध कार्यक्रम मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यामध्ये आयोजित करण्याकरिता महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : मभापं-२०२३/प्र.क्र.१३५/भाषा-२, दिनांक १९ डिसेंबर, २०२३ अन्वये सूचना निर्गमित केली आहे. सदर शासन परिपत्रकामधील आशय स्वंस्पष्ट असून सदर शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शासन परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनांनुसार दिनांक १४ जानेवारी, २०२४ ते दिनांक २८ जानेवारी, २०२४ या कालावधीमध्ये मराठी भाषेसंदर्भातील विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करावा.

13/1/2024
(प्रा.(डॉ.) विजय खरे)
प्रभारी कुलसचिव

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ )
जावक क्र. एएन/ 260 )
दिनांक : 13 JAN 2024 )

**सोबत :- वरीलप्रमाणे.**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग

सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.

Ms Nishigandha Khaire Madam
pl. do the needful
16/01/24

दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी, २०२४ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : मभापं-२०२३/प्र.क्र.१३५/भाषा-२
८ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १९.१२.२०२३

वाचा:- मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. मभापं-२०१९/प्र.क्र.१११/भाषा-२, दि. १८.०९.२०२०

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/महामंडळे, केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये, मंडळे/महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, सर्व खाजगी व व्यापारी बँका, सर्व शैक्षणिक संस्था/विद्यापीठे/महाविद्यालये इत्यादी संस्थांमधून राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने दरवर्षी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीमध्ये साजरा करण्यात येतो.

"मराठी भाषेचा प्रचार व प्रसार" या विभागाच्या मुख्य धोरणास अनुसरुन "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करण्यासाठी दरवर्षी विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना देण्यात येतात. त्यानुसार यावर्षी देखील मराठी भाषेसंदर्भातील विविध कार्यक्रम मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यामध्ये आयोजित करण्यासाठी सर्व कार्यालयांना सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन परिपत्रक :-</u>

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त सुयोग्य कार्यक्रम आयोजित करुन पंधरवडा समारंभपूर्वक साजरा करण्यासाठी सर्व कार्यालयांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

अ) राज्यातील सर्व कार्यालयांनी करावयाचे कार्यक्रम :-

१) मराठी भाषेसंबंधी, वाङ्मयासंबंधी विविध परिसंवाद /व्याख्याने / कार्यशाळा /शिबीरे/ कविसंमेलने/ एकांकिका/ बालनाट्ये/ नाटके/ पुस्तक प्रकाशन समारंभ/ साहित्य पुरस्कार वितरण यांचे आयोजन करणे.

२) मराठी भाषेत निबंध/ प्रश्नमंजुषा/ कथाकथन/ चारोळीलेखन/ कथालेखन/ कवितालेखन/ हस्ताक्षर/ शुद्धलेखन/ वक्तृत्व/ घोषवाक्ये/ अभिवाचन/ वादविवाद/ अंताक्षरी/ शब्दकोडी/ मराठी साहित्यासंबंधी पुस्तकांचे रसग्रहण/ समीक्षण/ परिच्छेद अनुवाद इत्यादी स्पर्धा घेणे.

३) मराठी वाचन संस्कृती वाढावी याद्दष्टीने मराठी भाषेतील अभिजात ग्रंथांचा परिचय करुन देण्यासाठी मराठी भाषेतील तज्ज्ञ नामवंत व्यक्ती/ लेखक/ वक्ते यांच्याकडून मार्गदर्शन, परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजन करणे.

४) ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथदिंडी, कथाकथन, काव्यवाचन, गाण्हाणीपट इत्यादी साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रम करणे.

५) वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वी असणाऱ्या मराठी भाषक व्यक्तींचा सत्कार, मुलाखती घेणे.

६) राज्यातील अमराठी भाषकांना मराठी भाषेचा सुलभ पध्दतीने परिचय करुन देण्याच्या दृष्टीने कार्यशाळा/ भाषेसंबंधी स्पर्धांचे आयोजन करणे.

७) मराठी भाषेच्या वापराबाबत जागरुकता निर्माण करण्याकरिता संबंधित कार्यालयांनी संकेतस्थळे, आकाशवाणी, दूरदर्शन, खाजगी दूरचित्रवाहिन्या, एफ.एम.रेडिओ, स्थानिक केबल नेटवर्क, फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप इ. अशा आधुनिक प्रसार माध्यमातून याबाबतचे दृक-श्राव्य संदेश प्रसारित करावेत.

८) मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व विकास यासाठी विविध मार्गांनी स्वयंप्रेरणेने काम करणाऱ्या व्यक्ती/ संस्था यांच्या कार्यास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या कार्याचा गौरव/ सत्कार करणे.

९) टंकलेखनाकरिता युनिकोड मराठीचा जास्तीतजास्त वापर करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करावे.

१०) मराठी भाषेचा प्रचार, प्रसार या उद्दिष्टांसह रोजगाराभिमुख उपक्रमातून जास्तीत जास्त तरुण पिढीला आकर्षित करण्यासाठी खालील विषयावरील तसेच अशा स्वरुपाच्या अन्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

१. अनुवादलेखन   २. व्यावसायिक लेखन   ३. पुस्तक निर्मिती व प्रकाशन प्रक्रिया
४. स्व-प्रकाशन   ५. ई-बुक   ६. ऑनलाईन पुस्तक विक्री
७. लेखक प्रकाशन करार   ८. संहिता लेखन   ९. विकिपिडिया कार्यशाळा
१०. शॉर्ट फिल्म/डॉक्युमेंटरी लेखन

११) डिजिटल साहित्य संमेलनाचे आयोजन करणे, तसेच मराठी वाचन संस्कृती जपण्यासाठी सर्वांनी मराठीतील साहित्य स्वयंस्फुर्तीने वाचणे, तसेच पुस्तके विकत घेणे, इतरांना भेट देणे इत्यादी उपक्रम राबवावेत.

१२) प्रत्येक जिल्ह्यात पुस्तकाची जत्रा आयोजित करण्यात यावी. या जत्रेत लोक आपली पुस्तके नि:शुल्क किंवा स्वस्त दरामध्ये इतरांना देऊ शकतील. तसेच, या जत्रेदरम्यान मराठीच्या प्रचार व प्रसारासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

१३) महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार वर्जित प्रयोजने वगळता शासकीय कामकाज १००% मराठी भाषेतून करणे आवश्यक आहे. तर, त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये/सार्वजनिक उपक्रम यांनी मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य आहे. त्यामुळे मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारासंदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा मराठी भाषा समितीमार्फत विविध उपक्रम राबवावेत तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, नियम, अधिनियम संबंधितांच्या निदर्शनास आणावेत.

१४) सर्व संस्थांनी समाज माध्यमांवर "मराठी वाचन कट्टा" निर्मिती करावी.

१५) सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी पंधरवड्याच्या निमित्ताने मराठी प्रचार, प्रसार व विकासासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करावे.

१६) मराठी भाषेच्या अभिजात दर्जाबाबत सर्वसामान्यांना माहिती व्हावी यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी राज्य मराठी विकास संस्थेच्या समन्वयाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे.

ब) राज्यस्तरावर साहित्य संस्थांच्या मदतीने वरील "अ" प्रमाणे करावयाची कार्यवाही :-

राज्यस्तरावर वरील कार्यक्रम सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व राज्य मराठी विकास संस्था यांनी खालीलप्रमाणे साहित्य संस्थांची मदत घेऊन त्या साहित्य संस्थांसमोर दर्शविलेल्या जिल्ह्यात कार्यक्रम आयोजित करावेत.

| अ.क्र. | साहित्य संस्था | साहित्य संस्थेच्या अंतर्गत जिल्हे |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर |
| २ | मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद | औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर. |
| ३ | विदर्भ साहित्य संघ, नागपूर | बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली |
| ४ | कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी | रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, ठाणे, पालघर, मुंबई उपनगर |
| ५ | दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर | कोल्हापूर |
| ६ | मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई. | मुंबई शहर |

क) आंतरराष्ट्रीय व आंतरराज्यीय महाराष्ट्र मंडळांनी देखिल या कालावधीत अनुक्रमे परदेशात व इतर राज्यात उपरोक्त "अ" मध्ये नमूद केल्यापैकी कार्यक्रम आयोजित करावेत.

ड) भाषा संचालनालयाने व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने तयार केलेल्या भ्रमणध्वनी उपयोजकाबद्दल (मोबाईल ॲप) तसेच मराठी भाषा विभागाच्या व त्या अंतर्गत कार्यालयांच्या संकेतस्थळांबद्दलची माहिती भाषा पंधरवड्याच्या निमिताने शाळा व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांपर्यंत प्रसारीत करण्याची जबाबदारी यारही क्षेत्रीय कार्यालयांची राहील.

आ) सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी "मराठी भाषा प्रचार व प्रसाराचे उपक्रम (कार्यक्रम)" महसूली विभाग व जिल्हास्तरावर राबविण्यासाठी निधी उपलब्ध करणेबाबतचा शासन निर्णय क्र.मभावा-२०२०/प्र.क्र.९८/भाषा-२, दि.२४.०६.२०२२ मधील परिच्छेद २ मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी. सदर कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी भाषा संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि राज्य मराठी विकास संस्था, मुंबई तसेच परिच्छेद "ब" येथे दर्शविलेल्या साहित्य संस्थांची मदत घेता येईल.

२. राज्यात तसेच जिल्हा स्तरावर त्यांच्या अखत्यारित असलेल्या कार्यक्षेत्रात वर दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणे आयोजन खालील कार्यालयांनी करावे.

अ) मुंबई (मुख्यालय स्तरावर)- सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांच्या अधिपत्याखालील मुंबईतील शासकीय कार्यालये

आ) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये

इ) सर्व जिल्हाधिकारी कार्यालये तसेच विविध विभागांच्या अधिपत्याखालील जिल्हास्तरीय कार्यालये

ई) मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद)-तालुकास्तरावर, ग्रामीणस्तरावर

उ) शासनाच्या अखत्यारितील कार्यालये/मंडळे/महामंडळे/सार्वजनिक उपक्रम,स्थानिक स्वराज्य संस्था

ऊ) शिक्षण संचालक/सर्व विभागीय सह संचालक/ उप संचालक/ जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक/ प्रौढ शिक्षण व अल्पसंख्यांक) कार्यालये व त्यांच्या अधिनस्त कार्यालये

ए) सर्व संचालक (उच्च शिक्षण,तंत्र शिक्षण, व्यवसाय विभाग, ग्रंथालये ) कार्यालये व त्यांच्या अधिनस्त कार्यालये

ऐ) महाराष्ट्र राज्यातील केंद्र सरकारची सर्व कार्यालये व आस्थापना आणि महाराष्ट्र राज्यातील जनतेला बँकींग, दूरध्वनी, टपाल, विमा, रेल्वे, मेट्रो, मोनोरेल, विमान प्रवास, गॅस, पेट्रोलियम, कराधान,पारपत्र इत्यादी सेवा पुरविणारी अन्य कार्यालये.

३. या कार्यक्रमांकरीता येणारा खर्च प्रत्येक वित्तीय वर्षात त्या त्या संबंधित विभागाने/कार्यालयाने त्यांच्या कार्यालयीन खर्चासाठी मंजूर होणाऱ्या आर्थिक तरतूदीतून अदा करावा.

४. सर्व कार्यालयांनी वरीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करुन या विभागास कार्यक्रमांबाबतचा अहवाल सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३१२१९११५३५१७१३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

URMILA KRISHNA DHADAWAD

Digitally signed by URMILA KRISHNA DHADAWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MARATHI LANGUAGE DEPARTMENT, 2.5.4.20=e1973f1efc804a45305a0d1193c84a37ac4f5eb9bd686940e1, e2195b713797b, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1359FBE8FCSF84F0E72F52E74786C5C0819E2F85121 1304561AC85EA06F5883, cn=URMILA KRISHNA DHADAWAD
Date: 2023.12.19 11:53:39 +05'30'

( उर्मिला धादवड )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा.मुख्य सचिव / अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
५) विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद/विधानसभा, विधानमंडळ, मुंबई (पत्राने)
६) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य/मराठी भाषा समिती सदस्य, विधानमंडळ, मुंबई (पत्राने)
७) सर्व विभागीय आयुक्त

८) सर्व जिल्हाधिकारी
९) कुलगुरु, सर्व विद्यापीठे
१०) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
११) शिक्षण संचालक (प्राथमिक /माध्यमिक/उच्च माध्यमिक/प्रौढ शिक्षण व अल्पसंख्यांक),
महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२) संचालक (उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, व्यवसाय शिक्षण, ग्रंथालये), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई (पत्राने),
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने),
१५) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१६) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
१७) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,
१८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
१९) महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२१) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२२) भाषा संचालक, भाषा संचालनालय, वांद्रे (पूर्व), मुंबई,
२३) सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
२४) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२५) संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
२६) सर्व विभागीय सहायक भाषा संचालक, पुणे / नागपूर / औरंगाबाद / नवी मुंबई,
२७) कार्यकारी अधिकारी,आकाशवाणी केंद्र,एच.टी.पारेख मार्ग,आमदार निवास समोर, चर्चगेट, मुंबई-४०००२०
२८) कार्यकारी अधिकारी, दूरदर्शन केंद्र, वरळी, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई
२९) सर्व केंद्रीय कार्यालयांची मुख्यालये /बँका, विमा कंपन्या व सार्वजनिक उपक्रम यांची मुख्यालये/
रेल्वे/विमान वाहतूक यांची मुख्यालये
३०) सर्व मंत्रालयीन विभाग
३१) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
३२) मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद
३३) विदर्भ साहित्य संघ, नागपूर
३४) कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी
३५) दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर
३६) मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई.
३७)निवडनस्ती (भाषा-२).

# गुरु गोबिंद सिंग फाऊंडेशन,
# गुरु गोबिंद सिंग अभियांत्रिकी महाविद्यालय व संशोधन केंद्र , नाशिक

## मराठी भाषा गौरव दिन निमित्त
## काव्य वाचन व गझल गायन
## कार्यक्रम

एक अनमोल संधी या कवींना ऐकण्याची:

**प्रमुख अतिथि:**

1. बाळासाहेब गिरी ( कवी, गझलकार)
2. वैजयंती सिन्नरकर. (लेखिका, कवयित्रि आणि प्रबोधनकार)
3. संजय आहेर (कवी,गीतकार/ विडंबनकार)

सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी आवाहन करण्यात येते की सर्वांनी ह्या कार्यक्रमात सहभागी व्हावे. ज्यांना काव्य वाचन व गझल सादर करायचे असेल त्यांनी आपली नावे खालील प्रतिनिधींकडे द्यावीत.

- संकेत जाधव {8767350764}
- प्राची गायकवाड {72194 99202}

**तारीख व वेळ : ०४.०३.२०२४**
**दुपारी : ०२: ०० वाजता**
**ठिकाण : LCS, हॉल**

**आयोजक : ग्रंथालय विभाग**

GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING AND RESEARCH CENTRE, NASHIK

*Invitation*

# ART FEST

ORGANISED BY
ART CLUB AND
INDOFEST CLUB

YOU ARE CORDIALLY INVITED TO GRACE THE SPECIAL OCCASION FOR THE ART FEST

**TIME-3.00PM**
**DATE-18 JAN 2024**
**VENUE -LIBRARY,2ND FLOOR**

GURU GOBIND SINGH FOUNDATION'S

GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING AND RESEARCH CENTRE, NASHIK

To, Mrs. Nishigandha Khaire

The Judges

YOU ARE CORDIALLY INVITED TO JUDGE THE ANNUAL DAYS (19 & 22 JAN 2024) PROGRAM

# Mela Antarang 2k24





**Venue: Guru Gobind Singh College of Engineering and Research Centre**

FROM - STUDENT COUNCIL & CULTURAL COMMITTEE (GCOERC)

Guru Gobind Singh Foundation's
**GURU GOBIND SINGH COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH CENTRE, NASHIK**
Khalsa Educational Complex, Guru Gobind Singh Marg, Wadala-Pathardi Road, Nashik-422009.
Ph. 0253 - 2372766, 7768004581, 82 Fax :- 0253 - 2372660
www.ggsf.edu.in • e-mail : gcoerc.nashik@ggsf.edu.in

No : 3646

To,
Principal

Subject :Decoration Material Requisition For Aart Fest Event 2024

1) Cardbord 10 qty
2) cardsheet paper (White Yellow Blue Pink) Per Colour 10 piece total 40
3) craft paper 10 qty
4) Colur Marker 4 qty
5 Poster colour 2 Packet
6)Glitter pen 2 Packet
7)Cello tape and Double Side tape 10 Piece
8) Black Cardsheet 10 piece
9) abro tape 2 Piece
10) Rangoli White, Yellow Green Black per 2 kg
11) Baloon White Red and Green 2 Packet
12) Balloon letter 7 qty ( ART FEST)

